// //

<u>नियमित फौजदारी खटला क्र. १२९/२०१०</u>
<u>निशाणी क्रमांक –५९/क</u>

<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा उलटतपास शपथेवर सुरु..</u>
<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्रीमती सोळांकुरे यांचेमार्फत</u>–

माझे इयत्ता दहावी पर्यंत शिक्षण झालेले आहे. सासरी असताना स्वयंपाक करण्याचे काम मी करत असे. मी व्यवस्थित स्वयंपाक करीत असल्यामुळे सकाळी व संध्याकाळी स्वयंपाक करण्याचे काम माझ्याकडे असायचे. लग्नाच्या पाच दिवसानंतर मी माहेरी गेले होते. थोडे दिवस राहून त्यानंतर मी पुन्हा सासरी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, सणाच्या निमित्ताने मी माहेरी जात असे. मुलीच्या जन्माअगोदर नऊ महिने मी सासरी राहत होते व प्रसुतीकरीता मी माहेरी गेले. दि.०७.११.२००९ रोजी मला मुलगी झाली. हे म्हणणे खरे आहे की, दि.२३.०४.२०१० रोजी माझ्या पतीने मला नांदावयास येण्याकरीता नोटीस पाठविली होती. सदरची नोटीस मला मिळाली. आता मी सदरची नोटीस पाहिली. ती तीच आहे. त्यास **नि.६७** देण्यात येते. नोटीस मिळाल्यानंतर मी सासरी नांदावयास गेले. त्यानंतर अंदाजे मी चार महिने सासरी राहीले. हे म्हणणे खरे आहे की, ते चार महिने मी, माझे पती व मुली सोबत स्वतंत्र राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पतीला हट्ट केल्यामुळे आम्ही स्वतंत्र राहत होतो. माझ्या माहेरची आर्थिक परिस्थिती सामान्य आहे. त्यावेळी मुलगी लहान असल्यामुळे तिला सोडून मला बाहेर कामासाठी जाता येत नव्हते. आम्ही जेथे रहात होतो तेथून हातकणंगले पोलीस स्टेशन अंदाजे एक कि.मी. अंतरावर आहे. आज रोजी मी आरोपी क्र.१ सोबत नांदावयास तयार नाही. माझ्या दीराचे लग्न झालेले आहे. माझी जाऊ हॉस्पीटलमध्ये नोकरी करते का याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या तक्रारीला दुजोरा देण्याकरीता आरोपींनी माझ्याकडे पाच तोळे दागिन्यांची मागणी केली असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारीमध्ये मी माहेरी कधी गेले याबाबतची तारीख नमुद नाही. तंटामुक्त समितीकडे मी अर्ज केल्यानंतर तेथे माझी हजर झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेथे मी नांदावयास तयार नसल्यामुळे

// //

सदरचा अर्ज निकाली काढण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, तंटामुक्त समितीकडे दिलेल्या अर्जाला बळकटी देण्याकरीता दोन दिवस विचार करुन मी आरोपींविरुध्द पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही भाडयाने रहात होतो त्यावेळी भाडयाचा खर्च व संसाराचा खर्च माझे पती देत होते. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारीमध्ये केलेले आरोप खोटे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या तक्रारीतील आरोप खोटे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण
फेरतपास नाही

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by RAHUL KESHAV DESHPANDE
Date: 2026.08.11 17:43:46 +0530

दिनांक ११/०८/२०२६.

(आर. के. देशपांडे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ वडगांव